# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
**Maharashtra University of Health Sciences, Nashik**

वणी - दिंडोरी रोड, म्हसरुळ, नाशिक - ४२२००४.
Vani – Dindori Road, Mhasrul, Nashik – 422 004.
EPABX : 0253-2539100-300, Phone : 0253-2539170,73
E-mail : sw@muhs.ac.in Web.:www.muhs.ac.in

MUHS

**संदिप श्रीराम कुलकर्णी**
(बी.एस.एल., एलएल.बी., एम.पी.ए., पी.जी.डी.एच.आर.)
**प्र.संचालक, विद्यार्थी कल्याण**

**Sandip Sriram kulkarni**
(B.S.L., LL.B., M.P.A., P.G.D.H.R)
**offg.Director, Student Welfare**


मआविवि/एसडब्ल्यु/स्कीम/ 296 /२०२२ दिनांक : 02 / 03/२०२२

प्रति,

मा. अधिष्ठाता/प्राचार्य

~~महर्षी होमिओपॅथीक वैद्यकीय~~
~~महाविद्यालय, हॉस्पिटल आणि रिसर्च~~
~~सेंटर, मौजे ... सर्वे नं. 248~~
~~ता. जावळी जि. सातारा - 415020~~

विषय : कमवा व शिका योजनेचे अनुदान आर.टी.जी.एस. केल्याबाबत....

संदर्भ : मआविवि/एसडब्ल्यु/स्कीम/५६०/२०२१ दि. ०१/०७/२०२१

महोदय/महोदया,

शैक्षणिक वर्ष २०२१-२२ साठी विद्यापीठाने लागू केलेली कमवा व शिका योजनेसाठीचे प्रस्ताव विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांकडून मागविण्यात आले आहेत. सदर प्रस्तावांची छाननी केल्यानंतर योजनेच्या अटी, शर्ती व निकषांनुसार योजनेचे अनुदान, प्रति विद्यार्थी रु.१६,०००/- इतकी रक्कम मिळणेसाठी खालील नमुद केलेल्या विद्यार्थ्यांचे प्रस्ताव पात्र ठरले आहेत. **यापूर्वी संदर्भीय परिपत्रकानुसार पाठविण्यात आलेल्या व नमुद केलेल्या अटी व शर्तींच्या अधीन राहून, महाविद्यालयाने सुट्टीचे दिवस वगळता प्रत्येक दिवशी फक्त दोनच तास निवडक स्वरुपाची कामे विद्यार्थ्यांना देण्यात यावी,** व त्या मोबदल्यात विद्यापीठातर्फे रु. ५०/- प्रती तास या दराने मेहनताना अदा करण्यात यावा. त्यासाठी खालील नमुद केल्याप्रमाणे 01 विद्यार्थ्यांकरीता व ऑडीट फी रु. ५००/- असे विद्यापीठाचे एकत्रित अनुदान म्हणून रु. 16500/- इतकी महाविद्यालयाच्या बचत खात्यात दि. 28/०२/२०२२ रोजी आर.टी.जी.एस. करण्यात आली आहे.

लाभार्थी विद्यार्थी : १) क्षिरसागर आदेश बाळासो.
२)
३)
४)
५)

Principal
MHMC

STS
10/3/2022

**अ) कमवा व शिका योजनेचे समायोजन करण्यासाठी पुढील कागदपत्रे सादर करणे अनिवार्य आहे.**

१) योजनेअंतर्गत महाविद्यालयाने **विद्यार्थ्यास** सोपविण्यात आलेल्या कामाचा उल्लेख करुन " कमवा व शिका योजनेकरीता .......................(विद्यार्थ्याचे नाव) .................या आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या गरीब विद्यार्थ्यास काम देण्यात आले आहे". असे अधिष्ठाता/प्राचार्य यांचे प्रमाणपत्र.

२) **योजना समन्वयक, अधिष्ठाता/प्राचार्य यांनी स्वाक्षरी केलेली कमवा व शिका योजनेतील विद्यार्थ्यांची दरमहा हजेरीपत्रकाची मुळ प्रत**. ( Original Copy)

३) योजनेत काम केलेल्या विद्यार्थ्यांना, विद्यापीठाच्या अनुदानातून देण्यात आलेल्या रक्कमेच्या धनाकर्ष अथवा धनादेशाच्या छायांकीत प्रती

४) धनादेश वटवलेल्या विद्यार्थ्यांच्या बँक पासबुकची छायांकीत प्रती

५) सनदी लेखापालांकडून परिक्षण केलेला रक्कमेचा जमाखर्चाचा हिशोब **मुळ प्रत**.(Original Copy)

६) सोबत जोडलेल्या विहित नमुन्यामध्ये, सनदी लेखापालांचे उपयोगिता प्रमाणपत्र **मुळ प्रत**. ( Utilisation Certificate ) ( Original Copy)

७) योजनेतंर्गत दिलेल्या, अनुदान रक्कमेच्या हिशोबाचे समायोजन करण्यासाठी वर नमुद केलेल्या सर्व कागदपत्रांची एकत्रितरित्या पुर्तता करुन, सदर पत्राच्या दिनांकापासुन, (उन्हाळी सुट्टी, हिवाळी सुट्टी वगळून किंवा विद्यार्थ्यास अपरिहार्य कारणामुळे, अपघात झाला किंवा आजारी असल्यास विद्यार्थी काम न करु शकल्यास पुढे तेवढेच सुट्टी घेतेलेले दिवस मोजुन तेवढेच दिवस काम देण्यात यावे) आठ महिने पुर्ण झाल्यानंतर पंधरा दिवसांच्या आत विद्यापीठास पाठविणे अनिवार्य आहे.

८) महाविद्यालयाने रु. ५००/- ची ऑडीट फी पावती पाठवावी. **मुळ प्रत**. ( Original Copy)

योजनेअंतर्गत काम करण्यास इच्छूक नसणाऱ्या विद्यार्थ्यांची रक्कम त्वरित विद्यापीठास परत करावी अन्यथा सदर रक्कमेवर बॅंकेच्या प्रचलीत व्याज दराप्रमाणे व्याज आकारण्यात येईल. कमवा व शिका योजना राबविली नसल्यास किंवा योजनेचे अनुदान शिल्लक राहिल्यास सदर अनुदानाची रक्कम **" कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक." यांच्या नावे नाशिक येथे देय असलेल्या धनाकर्षाव्दारे विद्यापीठास परत करावी.**

शिल्लक राहिलेली रक्कम विद्यापीठास परत करण्यासाठी, लागणाऱ्या खर्चाच्या रक्कमेचे देयक मंजूर होणार नाही. सदर खर्च महाविद्यालयाने करावयाचा आहे.

**सदर योजनेसाठीच्या लाभार्थी विद्यार्थ्यांसाठी पुढील सुचना देण्यात याव्यात.**

अ) योजनेचे लाभार्थी विद्यार्थी आपल्या शैक्षणिक अध्ययनात खंड पडू देणार नाही.

ब) योजनेतील कामाचा महाविद्यालयात नोकरी/सेवेशी कोणताही संबंध रहाणार नाही.

क) लाभार्थी विद्यार्थ्यांनी महाविद्यालयातील शिस्त व नियमांचे काटेकोरपणे पालन करावे.

ड) योजनेतील लाभार्थी विद्यार्थी दरवर्षी नव्याने निश्चित केले जातील, त्यासाठी विद्यार्थ्याने दरवर्षी नव्याने अर्ज करणे आवश्यक असेल.

इ) महाविद्यालयाने उपलब्ध करुन दिलेल्या कामाबाबत/सेवेबाबत तसेच आर्थिक व्यवहाराची संपूर्ण जबाबदारी महाविद्यालय व विद्यार्थी यांची असेल व त्याबाबत विद्यापीठाकडे तक्रार करता येणार नाही.

ई) लाभार्थी **विद्यार्थ्याला महिन्यातील** जास्तीत जास्त २० दिवस अशाप्रकारे वर्षातील जास्तीत जास्त ०८ महिने काम दयावे. त्यामुळे विद्यार्थ्याला (रु.५० प्रती तास प्रमाणे) कमाल रु. १६,०००/- प्रती वर्ष एवढीच रक्कम विद्यापीठातर्फे अदा करता येईल याची नोंद घ्यावी. **(रु ५०×२ तास ×२० दिवस =रु. २,०००/- दरमहा ×०८ महिने = १६,०००/-)** कमवा व शिका योजनेचा लाभ अंत्यत गरीब व गरजु विद्यार्थ्याना मिळावा यासाठी मा. अधिष्ठाता/प्राचार्य यांनी योजनेचे नियमित संनियंत्रण ( Regular Monitoring ) करणे आवश्यक आहे व विद्यापीठाच्या नियमांचे उल्लंघन होणार नाही. याची कृपया नोंद घ्यावयाची आहे.

तसेच आर.टी.जी.एस. झाल्याची पोहोच उलट टपाली देण्यात यावी व योजनेबाबतच्या सर्व सुचनांचे तंतोतंत पालन करावे. **सदर पत्राची प्रत संबधीत विद्यार्थ्यांस देण्यात यावी**. ही विनंती.

धन्यवाद **!**

**प्र.संचालक**
**विद्यार्थी कल्याण विभाग**

(**टिप** : सदर योजनेचा आठ महिन्याच्या कालावधी संपल्यानंतर दि.२८/०३/२०२३ पर्यत योजनेचे समायोजन करण्यासाठी प्रस्ताव पाठविण्यात यावा.)

**सोबत :** १) सनदी लेखापालांचे उपयोगिता प्रमाणपत्राची नमुना प्रत.
२) हजेरीपत्रकाची नमुना प्रत.
३) जमा व खर्चाचा हिशोब.

**माहितीस्तव प्रत** : महाविद्यालयाने सदर पत्राच्या छायांकीत प्रती लाभार्थी विद्यार्थ्यांना देण्यात याव्यात.

Sou. Devibai Narayandas Chhabada Rural Education Society, Satara's

# MAHALAXMI HOMOEOPATHIC MEDICAL COLLEGE, HOSPITAL & RESEARCH CENTER

Raigaon, Satara.

Gateway for Bright Future

Survey No. 259, At. Post- Raigaon, Tal.-Jaoli, Dist-Satara. Ph.: (02378) 200200, Fax : 240202
H.O.: Plot No. 30, Gulmohor Colony, Opp. I.T.I. Gendamal, Satara.
Phone : (02162) 250400, 250992, 250993, Fax : (02162) 250492.

SNC Gateway For Bright Future

Website : www.sdncedu.com
Email : info@sdncedu.com / sdncmhmc@gmail.com

Ref No MHMC/305/01/22

Date 17/01/2022

प्रती,

इन्चार्ज,

स्टुडंट वेल्फेअर डिपार्टमेंट

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ,

नाशिक-422004

विषय - आमच्या महाविद्यालयाचे अकाउंट डिटेल्स देण्याबाबत.

महोदय

वरील विषयास अनुसरून आमच्या महालक्ष्मी होमिओपॅथीक मेडिकल कॉलेज मधील दोन विद्यार्थी १कु.आदेश बाळासो क्षिरसागर, २. कु. सिद्धेश्वर नेटकरी यानी  कमवा व शिका योजनेअतर्गत विद्यापीठात फॉर्म सादर केले होते. त्याला विद्यापीठाची मान्यता मिळाली आहे.

तरी सदर विद्यार्थ्यांचे  पैसे ट्रान्सफर करण्यासाठी कॉलेजचे  अकाउंट डिटेल्स पाठवत आहे. अकाउंट डिटेल्स खालील प्रमाणे,

**कॉलेजचे नाव** ; महालक्ष्मी होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज रायगाव सातारा

**बँकेचे नाव** :युनियन बँक ऑफ इंडिया

**शाखा** : सातारा

**खाते क्र**: 579301010050304

IFSC CODE : UBINJ0557935

Mahalaxmi Homoeopathic Medical College, Hospital and Research Center ★ SEAL

**Principal**
Mahalaxmi Homoeopathic Medical College,
Hospital and Research Center Raigaon, Satara.